# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २६/१०/२०२४ (शनिवार) सायंकाळ**

---

## पोलीस स्टेशन नरखेड हददीतील बेलोना गावातील प्राप्त तक्रारीबाबत.

पोलीस स्टेशन नरखेड हददीत बेलोना हे गाव आहे. बेलोना गावात मोठया प्रमाणात जुगार चालतो अशा तक्रारी प्राप्त झालेल्या होत्या. त्याची अधिक माहीती घेण्याकरीता दिनांक २६/१०/२०२४ रोजी उपविभागिय पोलीस अधिकारी मा. श्री बापु रोहम तसेच पोलीस स्टेशन नरखेड चे ठाणेदार सहा.पोलीस निरक्षक श्री अजित कदम यांनी ग्राम भेट दिली असता सदर मिटींग मध्ये बेलोना गावात कोणत्याही प्रकारचे जुगार चालु नसल्या बाबत ग्रामस्थांनी सांगितले आहे.

## पोस्टे देवलापार हद्दीतील अवैधरित्या मोहाफुल गावठी दारू काढणाऱ्या इसमावर कायदेशिर कार्यवाही

दिनांक २५/१०/२०२४ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक पोस्टे देवलापार परिसरात प्रोव्हिशन रेडकामी फिरत असताना मुखबिर कडुन विश्वसनिय खबर मिळाली कि, देवलापार हद्दीतील नवेगाव चिचदा परिसरात एक इसम मोहाफुल हातभट्टी ची दारु गाळत आहे. अशा खबरे वरुन मोहाफुल गावठी दारू गाळणाऱ्या इसमावर कार्यवाही करण्यात आली. अवैधरित्या मोहाफुल गावठी दारु काढणारा **आरोपी नामे– कपूरचंद अमरलाल वरखडे वय ४१ वर्ष,रा. नवेगाव चिचदा तह – रामटेक जि. नागपुर** हा दगड विटांचे चुलीवर लोखंडी ड्रम ठेवुन हातभट्टी लावुन मोहाफुल गावठी दारू गाळतांना दिसुन आला. आरोपीचे ताब्यातून १) प्लॅस्टिक डबकी मध्ये ४० लिटर मोहफुल गावठी दारू किमती ४०००/–रु २) मोहफुल रसायन सडवा एकूण ११४० लिटर प्रत्येकी लिटर एकूण किमती ४७,९५०/– रु ३) भट्टी काढण्याचे साहित्य किमती १००००/–रु असा एकूण ६१,६५०/– रु चा मुद्देमाल मिळून आल्याने मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला. जप्त मुद्देमाल नाश करून सॅम्पल व कागदपत्र पुढील कायदेशीर प्रक्रिये करीता पोलीस ठाणे देवलापार यांचे ताब्यात देण्यात आले. त्याचे विरुद्ध कलम ६५( फ, क, ब, ई) महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. श्री हर्ष ए. पोद्दार पोलीस अधिक्षक नागपुर (ग्रा.), मा. श्री. रमेश धुमाळ अपर पोलीस अधिक्षक नागपुर (ग्रा) यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे, सपोनी किशोर शेरकी, सफौ विनोद काळे, पोहवा किशोर वानखेडे, पोहवा प्रमोद भोयर, पोना संजय बरोदिया यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर